# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. ४७-२२** **दिनांक १२/०२/२०२२**

## “मसाज व एक्स्ट्रा सर्व्हिसच्या नावाखाली अश्लिल कृत्य करणा-या स्पा वरती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई”

दि.११/०२/२०२२ रोजी अनैतिक मानवी प्रतिबंध कक्षाचे वपोनि श्री एस.एस.पाटील यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, “ ले सेरेन स्पा ” (फॅमिली सलुन ॲन्ड स्पा ) अजित पॅलेस जवळ, पेनणकरपाडा, काशिमीरा या स्पामध्ये येणा-या गि-हाईकाकडुन मसाज व एक्स्ट्रा सर्व्हिसच्या (अतिरिक्त सेवा) नावाखाली जास्त पैसे घेवुन मुली गि-हाईकाशी अश्लील चाळे करत असून सदर मुली करीत असलेल्या कृत्यास स्पाचे चालक /व्यवस्थापक प्रोत्साहीत करीत आहेत.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वपोनि. श्री. पाटील, यांनी बोगस गि-हाईक व पंच यांना “ ले सेरेन स्पा ”(फॅमिली सलुन ॲन्ड स्पा ), अजित पॅलेस जवळ, पेनणकरपाडा, काशिमीरा या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह १७.२० वाजता छापा टाकला असता, स्पा मध्ये एक महिला, बोगस गि-हाईकाशी अश्लील चाळे करीत असतांना मिळुन आली. तसेच सदर स्पामध्ये काम करणारा छोटु कुमार पासवान वय २२ वर्ष व चालक मुनताज खान वय ३७ वर्ष यांनी आपसात संगणमत करुन बोगस गि-हाईकास ०२ महिलांना दाखवले आणि मसाज व एक्स्ट्रा सर्व्हिस (अतिरिक्त सेवा) च्या नावाखाली २,०००/- रुपये स्विकारले व एका महिलेस बोगस गि-हाईका समवेत पाठवुन सदरच्या कृत्यास प्रोत्साहित केल्याचे निदर्शनास आल्याने छोटु पासवान व मुनताज खान व इतर ०२ महिलांना बोगस गि-हाईकाकडुन स्विकारलेली रक्कम व इतर कॅश काऊन्टर मधुन जप्त केलेले असे एकुण ३१३०/-रुपये सह ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत महिला पोलीस अंमलदार सुप्रिया नथु तिवले, नेमणुक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ८६/२०२२, भा.द.वि.सं. कलम २९४,११४, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त डॉ.श्री महेश पाटील,(गुन्हे),सहा. पोलीस आयुक्त, श्री अमोल मांडवे,(गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पोहवा उमेश पाटील, विजय निलंगे,रामचंद्र पाटील, मपोना वैष्णवी यंबर, मपोशि सुप्रिया तिवले, नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.